क्र.२/नसवि/महासभा/ ०२ /२०२१-२०२२
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ०३ मे २०२१

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## महानगरपालिका सभा क्रमांक - ०२ /२०२१-२०२२

### महानगरपालिका सभेची नोटीस (ऑनलाईन अॅपद्वारे)

प्रति,
मा. ----------------------------
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मधील तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **बुधवार दि.१२/०५/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय, सांगली येथे मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दि.०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये ऑनलाईन अॅपद्वारे आयोजित केली आहे.** या सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचाराधीन आहेत. तरी आपण सदर सभेस ऑनलाईन सहभागी व्हावे हि विनंती.

**सदर ऑनलाईन (Zoom App) सभेसाठी मिटींग आयडी-४१५६८०३७९० पासवर्ड-१२३४५ असा आहे.**

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि.१९/०४/२०२१ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दु:खवट्याचे ठराव. ब) अभिनंदनाचे ठराव.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. सांगली येथील वॉर्ड क्र.१७ महावीर उद्यान नजीक डॉ.व्होरा समोरील म.न.पा. खुल्या जागेस कंपौंड भिंत बांधणेची कामगिरी ऐवजी वॉर्ड क्र.१७ मधील प्रगती कॉलनी मनपा ओपन स्पेसवर कंपौंड भिंत बांधणे अंदाजपत्रकीय र.रु.१०,८६,६३१/- मात्रच्या कामगिरीचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता देणेकामी **नगर अभियंता तथा शहर अभियंता यांचे दि.३०/०४/२०२१ चे विषयपत्र.**

५. सांगली येथील जुना कुपवाड रोड कोरे असेटस ते रेल्वे गोडवून जवाहर हौ.सोसायटी पर्यंत पु.प.रस्ता हॉटमिक्स डांबरीकरणाने सुधारणा करणेची कामगिरी अर्धवट होवून न्यायप्रविष्ठ झालेने, सदर कामगिरीच्या र.रु.५४,२७,०००/- मात्र शिल्लक रक्कमेमधून पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर चौक ते सुंदर पार्क ८० फुटी डी.पी.रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणेस सदर मुळ कामाचे मंजुर मक्तेदार डी.बी.गुंजाटे यांचेकडून ३.५०% जादा दराने कामगिरी करुन घेणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.२८/०४/२०२१ चे विषयपत्र.**

६. महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाकरिता महिला व बाल विकास अधिकारी पद निर्मितीस व सदर पदाचे सेवा प्रवेश नियमाच्या मसुद्यास मान्यतेसाठी मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.११/०२/२०२१ चे विषयपत्र.**

७. महानगरपालिकेकडून आदिसागर मंगल कार्यालय येथे कोविड रुग्णांचेसाठी सुरु करण्यात आलेल्या डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटरचे प्रति महा रु.१ लाख प्रमाणे माहे १९ ऑगस्ट २०२० पासून ५ फेब्रुवारी २०२१ असे साडेपाच महिन्यांचे एकूण रु.५.५० लाख मात्र भाडे अदा करणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१८/०३/२०२१ चे विषयपत्र.**

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सूचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०२/२०२१-२०२२

## महापालिका सभा दिनांक १२/०५/२०२१ करीता.(ऑनलाईन ॲपद्वारे)

बुधवार दि.१२/०५/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय, सांगली येथे ऑनलाईन ॲपद्वारे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

१. **श्री.युवराज सतिश बावडेकर यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली प्रभाग क्र.१४ मधील झाशी चौक येथे महापालिकेच सार्वजनिक मुतारी असून, सदर मुतारी भरबाजार पेठेत रस्त्यावर असून, या मुतारीमुळे रस्त्यावर मलमुत्र येवून दुर्गंधी पसरुन नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे. तसेच मुतारी रस्त्यावर असल्यामुळे रस्त्याची रुंदी कमी होवून वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण झालेला आहे. त्यामुळे सदर मुतारी हलविण्याबाबत नागरिक व व्यापाऱ्यांनी वारंवार तक्रार महापालिकेकडे केलेली आहे. तसेच याबाबत आजुबाजूच्या नागरिकांना व रहिवाश्यांना, व्यापाऱ्यांना त्रास होत असल्याने त्यांनी सदर मुतारी पाडणेबाबत मागणी करीत आहेत. नागरिकांचे मागणीनुसार सदर मुतारी पाडणेकामी मान्यता मिळणेसाठी आलेला प्रस्ताव.

२. **सौ.आरती रविंद्र वळवडे यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महापालिका क्षेत्रातील गावभाग येथील महापालिका हॉस्पिटल येथे पुर्वी होमिओपॅथीक हॉस्पिटल चालविण्यात येत होते. परंतु सद्या हे हॉस्पिटल बंद असल्याने या ठिकाणी असलेल्या नागरिकांना होमिओपॅथीक औषध उपचारा करीता इतरत्र जावे लागते. गुलाबराव पाटील होमिओपॅथीक मेडीकल कॉलेज व हॉस्पिटल मिरज यांना या ठिकाणी दवाखाना चालू करणेस दिल्यास या परिसरातील नागरिकांची मोठी सोय होणार आहे व सदरचे हॉस्पिटल हे गुलाबराव पाटील होमिओपॅथीक मेडीकल कॉलेज व हॉस्पिटल मिरज यांच्या मार्फत त्यांचेच डॉक्टर व इतर स्टाफ घेवून त्याच बरोबर याकरीता लागणारे होमिओपॅथीक औषध देखील तेच पुरवतील त्यामुळे महानगरपालिकेवर कोणताही आर्थिक बोजा न पडता येथील नागरिकांची मोठी सोय होणार आहे. तरी गुलाबराव पाटील होमिओपॅथीक मेडीकल कॉलेज व हॉस्पिटल मिरज यांना होमिओपॅथीक हॉस्पिटल करीता जागा उपलब्ध करुन देणेकामी आलेला प्रस्ताव.

३. **श्री.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिकेच्या सन्मा.सदस्यांकडून आवश्यक बाबींचा पाठपुरावा करुन विविध विकास कामांना मंजुरी प्राप्त करुन घेतली जाते व सदरची कामे मनपा नोंदणीकृत मक्तेदारांकडून केली जातात. परंतु, काही वेळा सदरची कामे वेळेत पुर्ण होत असलेचे दिसून येत नाहीत. हॉटमिक्स रस्ता करीत असताना BM व BC थर पसरताना ठरावीत तापमान (१२० C च्या वर) गरजेचे असते. सदर तापमान हॉटमिक्स प्लॅन्ट महानगरपालिका क्षेत्रापासून २० किलोमीटर अंतरावर असणे आवश्यक आहे व संबंधीत मक्तेदाराने तसा दाखला निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे. तरी, यापुढे केल्या जाणाऱ्या विकास कामांसाठी सदर बाबींची पुर्तता करुन घेवूनच संबंधीत मक्तेदारास पात्र ठरविणेत यावे. सदरकामी मंजुरी मिळणेस निर्णयार्थ आलेला प्रस्ताव.

४. **सौ.संगिता अभिजीत हारगे व श्री.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महासभा क्र.०४ विषय क्र.१(ज) ठराव क्र.९८ दि.२०/०१/२०२१ च्या ठरावानुसार बेडग रस्त्यावरील मनपा कॉमन इन्सिनेटर प्रकल्प व त्यास आवश्यक जागा व सद्यस्थितीतील इमारतीचा ताबा देवून सदर प्रकल्प IMA पुजाची शिरोली यांना प्रति महा र.रु.४० हजार रॉयल्टी भरणेच्या अटीवर पंधरा वर्षे मुदतीने देण्याचा निर्णय झालेला होता. तथापि, IMA मिरज यांनी सदर प्रकल्प उभा करण्यासाठी व वेळोवेळी होणाऱ्या देखभाल दुरुस्तीवर तसेच MPCB कडून घेणेत आलेले आक्षेपांचे निराकरण करणेसाठी आवश्यक बाबींची पुर्तता करणेत आलेली आहे व याकामी आज अखेर अंदाजीत रु.७० ते ८० लक्ष इतका खर्च केलेला आहे. सद्या सदरचा प्रकल्प सुरु होणाच्या मार्गावर असून, सदरचा प्रकल्प इतर कोणास चालविणसे दिल्यास तर IMA मिरज हे न्यायालयामध्ये जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सुरु होणारा प्रकल्प रखडून विनाकारण न्यायालयीन बाब निर्माण होणार आहे. त्यामुळे IMA मिरज यांना प्रतिमहा र.रु.४० हजार रॉयल्टी भरन घेवून, १५ वर्षे मुदतीने चालविण्यास देणेकामी निर्णयार्थ आलेला प्रस्ताव.

---

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक : ०७/०५/२०२१.

**महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०२** दिनांक :- १२/०५/२०२१

ठराव क्रमांक :- **३७**

विषय क्रमांक :- ०४

---

सोबतचे नगर अभियंता तथा शहर अभियंता यांचे दि.३०/०४/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली येथील वॉर्ड क्र.१७ महावीर उद्यान नजीक डॉ.व्होरा समोरील म.न.पा. खुल्या जागेस कंपौंड भिंत बांधणे अंदाजपत्रकीय र.रु.१०,८६,६३१/- मात्रचे कामगिरीकरिता मा.सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत निधी मंजुर झालेला होता व सदर कामी निविदा प्रक्रिया पुर्ण झालेली होती. तथापि, सदर प्रस्तावित जागेवर मोठ्या प्रमाणात वृक्ष असून, सदरचे वृक्ष काढणे अशक्य असल्याने त्याऐवजी वॉर्ड क्र.१७ मधील प्रगती कॉलनी मनपा ओपन स्पेसवर कंपौंड भिंत बांधणे अंदाजपत्रकीय र.रु.१०,८६,६३१/- मात्रच्या कामगिरीचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- अ. उत्तम साखळकर. ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi

अनुमोदक :- सौ. पद्मश्री पाटील. महापौर,

नगरसचिव

महापालिका सचिव
सांगली, मिरज व कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०२** दिनांक :- १२/०५/२०२१

ठराव क्रमांक :- ३८

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.२८/०४/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली येथील जुना कुपवाड रोड कोरे असेटस ते रेल्वे गोडवून जवाहर हौ.सोसायटी पर्यत पु.प.रस्ता हॉटमिक्स डांबरीकरणाने सुधारणा करणेची कामगिरी अर्धवट होवून न्यायप्रविष्ठ झालेने, सदर कामगिरीच्या र.रु.५४,२७,०००/- मात्र शिल्लक रक्कमेमधून पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर चौक ते सुंदर पार्क ८० फुटी डी.पी.रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणेस सदर मुळ कामाचे मंजुर मक्तेदार डी.बी.गुंजाटे यांचेकडून ३.५०% जादा दराने कामगिरी करुन घेणेसाठी प्राप्त झालेला प्रस्ताव हा मंजुर कामगिरी ऐवजी लगतच्या पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर चौक ते सुंदर पार्क ८० फुटी डी.पी.रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे या ठिकाणी करणेस सदरचा प्रस्ताव जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती,सांगली यांचेकडे मान्यतेस्तव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सौ.स्नेहल सचिन सावंत यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.स्थायी समिती ठराव क्र.७३ दि.०६/०८/२०१९-२०/०८/२०१९ रोजीचे ठरावान्वये महापालिका क्षेत्रातील विकास कामांचा मा.जिल्हाधिकारीसो यांचेकडे सन २०१८-१९ वर्षातील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार समिती योजनेंर्तगत रु.५,००,११,०००/- मात्रचा एकूण ४२ कामांचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावातील खालील कामगिऱ्यांचा प्रस्ताव दुबार झालेला असल्याने, त्याऐवजी प्रस्तावित वॉर्डातील मंजूर निधीमधून त्याच वॉर्डातील नव्याने सूचित करणेत आलेली विकास कामे करणेस सदरचा प्रस्ताव जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती,सांगली यांचेकडे मान्यतेस्तव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

| पूर्वीच्या प्रस्तावातील काम क्रमांक | कामाचे नाव व अंदाजपत्रकीय र.रु. | नव्याने सूचित केलेले कामाचे नाव व अंदाजपत्रकीय र.रु. |
|---|---|---|
| २४ | वॉर्ड क्र.८ दुर्गा टी स्टॉल समोरील पु.प.रस्ता डांबरीकरण करणे. अ.र.रु.२३,३०,५००/- | वॉर्ड क्र.१४ हरीपूर रोड नाल्यालगतचे १०० फुट रोडचे हॉटमिक्स डांबरीकरण करणे. अ.र.रु.१०,११,०७६/- |
| २६ | वॉर्ड क्र.१८ सरस्वती निवास ते धामणी हद्दीपर्यतच्या मुख्य रस्त्यापर्यतच्या द.उ.रस्ता पु.रस्ता डांबरीकरण करणे. अ.र.रु.१०,५२,३००/- | वॉर्ड क्र.१८ पोळ मळा अंतर्गत पी.सी.सी.गटर करणे. अ.र.रु.२०,४५,०९७/- |
| २७ | वॉर्ड क्र.१८ विसावा बंगला लगतचा द.उ.रस्ता व पु.प.दोन रस्ते डांबरीकरण करणे. अ.र.रु.२३,३३,३००/- | वॉर्ड क्र.१८ मुसळे प्लॉट अंतर्गत पी.सी.सी.गटर करणे. अ.र.रु.७,०१,८००/- |
| २८ | वॉर्ड क्र.१८ मलमे घर ते भोसले घर द.उ.रस्ता डांबरीकरण करणे. अ.र.रु.८,०१,१००/- | वॉर्ड क्र.१८ मधील सावंत प्लॉट पाराजीत कॉलनी नं.१ व २ पी.सी.सी.गटर करणे. अ.र.रु.९,२२,९००/- |

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.८ मधील सदगुरु सोसायटी धनवडे घर ते घारगे घर टी टाईप रस्ता मुरुमीकरण करणे अंदाजित र.रु.५,६६,४०२/- या कामगिरी महापालिकेच्या सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना यामधून प्रस्तावित करणेत आलेली होती. सदर कामगिरी ऐवजी कुपवाड वॉर्ड क्र.८ मधीलच शाहूनगर पुर्व भाग परिसरातील रस्ते मुरुमीकरण करणे अंदाजित र.रु.५,६६,४०२/- मात्रची कामगिरी करणेस सदरचा प्रस्ताव जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती,सांगली यांचेकडे मान्यतेस्तव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. उत्तम साखळकर.

महापौर,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०२** दिनांक :- १२/०५/२०२१

ठराव क्रमांक :- ३९

विषय क्रमांक :- ०६

---

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.११/०२/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाकरिता महिला व बाल विकास अधिकारी पद निर्मितीस व सदर पदाचे सेवा प्रवेश नियमाच्या मसुद्यास मान्यतेसाठी मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, महिला बालकल्याण समिती कडील दैनंदिन कामकाज व्यवस्थीत पार पाडणेसाठी व कामकाजमध्ये सुसूत्रता येणेच्या दृष्टीने महिला व बालकल्याण समितीकडे स्वतंत्र सक्षम महिला अधिकारी यांची नियुक्ती करणेस ही सभा सूचित करीत आहे.

सूचक :- [signature] श्री. उत्तम साखळकर

अनुमोदक :- [signature] श्री. प्रकाश मुळके

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]

महापौर,

प्रशा. अधि. (आस्था)

[signature]

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०२**

दिनांक :- १२/०५/२०२१

ठराव क्रमांक :- ४०

विषय क्रमांक :- ०७

---

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१८/०३/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेकडून आदिसागर मंगल कार्यालय येथे कोविड रुग्णांचेसाठी सुरु करण्यात आलेल्या डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटरचे प्रति महा रु.१ लाख प्रमाणे माहे १९ ऑगस्ट २०२० पासून ५ फेब्रुवारी २०२१ असे साडेपाच महिन्यांचे एकूण रु.५.५० लाख मात्र भाडे अदा करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, सदर संस्थेने कोरोना महामारीच्या काळामध्ये महापालिकेस डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटरसाठी सदरचे कार्यालय तात्काळ उपलब्ध करुन दिल्याबद्दल सदर संस्थेचे सर्व संचालकांना तसेच, सदर डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटरला ज्या दानशुर व्यक्ती अथवा संस्था यांनी भेटवस्तु अथवा अन्य माध्यमातून मदत केली असेल अशा सर्व व्यक्ती व संस्था यांनाही महापालिकेने आभार पत्र देवून, त्यांचा यथोचित सन्मान करावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री. उत्तम साखळकर.

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ. पद्मश्री पाटील

Dr. Suryavanshi

महापौर,

नगरसचिव

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०२** दिनांक :- १२/०५/२०२१

ठराव क्रमांक :- ४१

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०३/०५/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२०-२१ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील मा.महासभा ठरावान्वये मान्यता मिळालेल्या एकूण १३१ कामांपैकी एकूण शिल्लक निधी र.रु.७ कोटीच्या मर्यादेत ६८ कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणेसाठी खालील नमुद कामांना प्रधान्यक्रमाने ही सभा मान्यता देत असून, सदरचा प्रस्ताव जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती,सांगली यांचेकडे मान्यतेस्तव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

| अ.क्रं | प्रस्तावित विकास कामे | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | सांगली खणभाग पाटणे गल्ली येथील द.+ उ रस्ता पाटणे बिल्डिंग ते ख्रिस्ती विश्वासी मंडळ पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ४३९९०० |
| २ | वॉर्ड क्रं १६ खणभाग भांडवले गल्ली गरीब नवाज मशीद मागील रस्ता कॉंक्रीट करणे तसेच पी.सी.सी. गटर करणे. | ६६७४०० |
| ३ | वॉर्ड क्रं १६ मधील स्टेशन रोड येथील टॉप ईन टाऊन दुकान ते भोसले कॉम्प्लेक्स कॉंक्रिटीकरण व ठीक ठिकाणी कॉंक्रिटीकरण करणे. | ३३१४०० |
| ४ | सांगली वखरभाग श्री कृष्ण सरस्वती दत्त महाराज मठ ते श्री दत्त मोटर्स द.+ऊ रस्ता डांबरीकरणाने सुधारणा करणे. | १००८४०० |
| ५ | वॉर्ड क्रं . १२ मधील ईदगाह रस्ता शाम विभूते घर ते महेश पाटील घर पांजरपोळ समोरील पू.+प. रस्ता डांबरीकरणाने करणे. | ५०९९०० |
| ६ | वॉर्ड क्रं. १० मधील पटेल सॉ मिल ते भारत गॅस गोडावून पर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | १५००००० |
| ७ | वॉर्ड क्रं. १० सांगली मार्केट कमिटी कर्मचारी हौसिंग सोसायटी अंतर्गत रस्ते हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | १५००३०० |
| ८ | वॉर्ड क्रं. १५ गणेशनगर ५ वी गल्ली T टाईप रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | ११४५००० |
| ९ | सांगली वॉर्ड क्रं. १७ मनपा ओपन स्पेस मोती चौक सभागृहा भोवती वॉल कंपाऊंड करणे. | १९३०१०० |
| १० | कुपवाड प्रभागतील क्रं. ८ मधील सदानंद पार्क व उत्कर्ष नगर मधील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | १०००००० |
| ११ | कुपवाड प्रभागातील वॉर्ड क्रं. १ छत्रपती शिवाजी महाराज मार्ग येथील स्वाती गॅस एजन्सी (१०० फूटी रोड) ते संजय बेडगे घरापर्यंत आर.सी.सी. गटर करणे. | १४९८२०० |
| १२ | कुपवाड प्रभागातील वॉर्ड क्रं.२ वाघमोडेनगर मधील खांडेकर घर ते शेंडगे घरापर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | ५३७००० |

| | | |
|---|---|---|
| १३ | कुपवाड प्रभागातील वॉर्ड क्रं.८ सुखकर्ता पार्क मधील स्वप्नपूर्ती बंगला ते शिवम बंगला व साबळे घरलगतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | ७३१४०० |
| १४ | कुपवाड प्रभागातील वॉर्ड क्रं.८ क सत्यसाईनगर मधील श्रीकृपा हाईट्स अपार्टमेंट ते उदय बंगला पर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | ४६४५०० |
| १५ | मिरज वॉर्ड क्रं.५ झन्याबाबा दर्गा मागील रस्ते डांबरीकरण करणे. | १४३४००० |
| १६ | मिरज वॉर्ड क्रं. ५ भीमनगर अंतर्गतरस्ते कॉंक्रीट करणे. | १४६३९०० |
| १७ | मिरज वॉर्ड क्रं. ४ मधील ठाणेदार वकील घर ते छत्रे घरा पर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | १४००२०० |
| १८ | मिरज वॉर्ड क्रं. ३ अ, मधील साईनंदन अपार्टमेंट ते ओमासे अपार्टमेंट पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | १३८११०० |
| १९ | मिरज वॉर्ड क्रं. ४ संभा तालीम ते हिरेमठ घर ते ढेरे घर ते गुरव घरा पर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | १४४५७०० |
| २० | मिरज वॉर्ड क्रं. ३ महाबळ फार्म हाऊस ते द टू क्लब व महाबळ ऑटो समोरील रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | १५२३८०० |
| २१ | सांगली वॉर्ड क्रं. १७ मधील मनपा त्रिकोणी बागेस कंपाऊंड करणे. | ४७००००० |
| २२ | सांगली वॉर्ड क्रं. १७ जिनवाणी बंगला ते सुमेल बंगल्या पासून धामणी रोड पर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | ७५२००० |
| २३ | सांगली वॉर्ड क्रं. १७ मधील लालबाग गणेश मंदिर ते केडगे घर पर्यंत आर.सी.सी. गटर करणे. | ७११५०० |
| २४ | कुपवाड वॉर्ड क्रं.९ मधील अहिल्यादेवी हौसिंग सोसायटी मधील महागरपालिकेच्या मोकळ्या जागेस वॉल कंपाऊंडकरणे. | १२९९८०० |
| २५ | वॉर्ड क्रं. ९ रानडे मळा मधील सचिन ज्वेलर्स ते वैभव अपार्टमेंट पर्यंत आर.सी.सी. गटर करणे. | १८८१३०० |
| २६ | वॉर्ड क्रं. १९ मधील गणेश अंगडी घर ते श्रीकांत खंडागळे घरापर्यंतचा रस्ता बी.बी.एम. डांबरी करणे. | ५५०००० |
| २७ | वॉर्ड क्रं. १८ मधील मिलन गादी कारखाना पिछाडीस गल्ली नं. ४ येथे पी.सी.सी.गटर करणे. | ५००००० |
| २८ | सांगली वॉर्ड क्रं. १४ मधील विधाता चौक केशवनाथ मंदिर ते नवभारत चौक, रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | ५००००० |
| २९ | सांगली वॉर्ड क्रं. १४ मधील गावभाग बाळेकुंद्री महाराज मठ ते बापट घर बावडेकर वाडा पर्यंतचारस्ता ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे. | ५००००० |
| ३० | सांगली वॉर्ड क्रं.१४ मधील माकडशिंगी पोलीस चौकी ते विसावा चौक ते गुरूनाथ कुलकर्णी घरापर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | ५००००० |
| ३१ | सांगली वॉर्ड क्रं. १९ मधील वानलेसवाडी श्रीरामनगर अंतर्गत पी.सी.सी.गटर करणे. | ४९७००० |
| ३२ | वॉर्ड क्रं. ७ मधील कोळेकर मठ ( खुरपे घर ) पासून मळवाडे घरा पर्यंत रस्ता करणे. | ६००००० |
| ३३ | मिरज वॉर्ड क्रं. १२ मधील शिवशंभो चौक जवळील बायपास रोड येथे श्री गणेश फयब्रिकेशन ते माऊली बंगला तसेच सलीम महत ते आनंदा सरगर द.+ऊ रस्ता डांबरीकरण सुधारणा करणे. | ७००००० |
| ३४ | वॉर्ड क्रं. १८ कोल्हापूर रोड आकाशवाणी जवळील सुभाषनगर गल्ली नं.-५ येथील रस्ताडांबरीकरण करणे. | १०००००० |
| ३५ | प्रभाग क्रं ११. मधील शांतीनिकेतन येथील त्रिमूर्ति बंगलो ते हरिश्चंद्र बंगलो पर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | १०५८२०० |

| | | |
|---|---|---|
| ३६ | सांगली वॉर्ड क्रं. १५ मधील फौजदार गल्ली येथील एडके घर ते अतुल सावंत घरा पर्यंतची गटार तसेच एडके घर ते ईश्वरस्वप्न घरा पर्यंतची गटार नूतनीकरण करणे. | १०००००० |
| ३७ | प्रभाग क्रं १८ मधील रंगनाथ दांडेकर मार्ग लक्ष्मीनगर गल्ली क्रं १ मुख्य रस्त्यात ९ मीटर उंचीचे खांब टाकणे. | ५००००० |
| ३८ | प्रभाग क्रं. ११ मधील केशव कॉलनी अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | १०५८२०० |
| ३९ | प्रभाग क्रं. १० मधील सर्वोदय कॉलनी येथील युवराज पवार घर ते गजानन पवार घर आणि जनाबाई घर ते नारायण वडर घरा पर्यंतचा रस्ता कोंक्रीटीकरण करणे. | ७००००० |
| ४० | मिरज वॉर्ड क्रं.५ मधील मिरज बोलवाड रोड, दुर्गाडे मळा व कोरे मळा अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | ९९५२०० |
| ४१ | वॉर्ड क्रं. १० मधील स.नं २९६/२ अ मध्ये कोंची कोरवी माकडवाले समाजासाठी सामाजिक सभागृह बांधणे. | ९००००० |
| ४२ | वॉर्ड क्रं. १६ पंचमुखी मारुती रोड ते स्वराज्य चहा ते मंदार अपार्टमेंट कण्से गल्ली,पी.सी.सी. गटर करणे. | ४७९५०० |
| ४३ | वॉर्ड क्रं. १६ जयभवानी रोड येथील भिमराव बिल्डिंग ते गणपतीमुळे घर तसेच कार्लेकर घर ते श्रीपाद चिरमुरे घरा पर्यंत पूर्व पश्चिम रस्त्यावर गटर करणे. | ५५९४०० |
| ४४ | मिरज वॉर्ड क्रं. ६ मधील धनगर गल्ली ते बिरोबा मंदिर ते कामगार भवन पर्यंत रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | १७११७०० |
| ४५ | मिरज वॉर्ड क्रं. ६ मधील उमर फारूख मशीद ते यादगार फोटो स्टुडिओ पर्यंत रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | १३०९७०० |
| ४६ | मिरज वॉर्ड क्रं. २० मधील कृष्णा घाट रोड पारधी वसाहत मधील रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | ९०८००० |
| ४७ | सांगलीवाडी वॉर्ड क्रं.१३ ब, सांगली. इस्लामपूर रोड आदर्श नागरी पतसंस्था ते बाळे अलदर घर पू.+प. रस्ता सुधारणा करणे. | ६५३६०० |
| ४८ | मिरज वॉर्ड क्रं. ६ मधील सुगारे बोळ, सन्मुख बोळ, शालीमार बोळ रस्ते सुधारणा करणे. | ८००००० |
| ४९ | कुपवाड वॉर्ड क्रं. 1 मधील प्रकाशनगर गल्ली क्रं. 3 परिसरातील कमाल बेकर्स ते संदीप मोबाईल सप्लाय ते हिंदुराज अवघडे घरापर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | ११८२४०० |
| ५० | प्रभाग क्रं ५ बी.चा मळा येथील रावसाहेब मुत्तूरे घर ते मिरज ओढा रस्ता डांबरीकरण करणे. | ६३६८०० |
| ५१ | वॉर्ड क्रं. ११ मधील चिंतामणी केशव कॉलनी परिसरातील उत्तर बाजूस पू.+प. आर.सी.सी. गटर करणे. | ११२७७०० |
| ५२ | कुपवाड प्रभागातील वॉर्ड क्रं. १ मेन रोड साजीद गॅरेज ते नाल्या पर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | ९९८९०० |
| ५३ | कुपवाड प्रभागातील वॉर्ड क्रं. २ वाघमोडे नगर मधील तरटे घर ते नाना मासाळ घरा पर्यंतचा रस्ता पी.सी.सी. करणे. | ९९८५०० |
| ५४ | मिरज वॉर्ड क्रं. ६ मधील दर्गा चौक, महाराष्ट्र बेकरी ते वड्ड घर ते कॉर्नर टेलर ते मुस्लिम मोहल्ला ते कबाडे गल्ली, नाकाटे घरा पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | १२४४२०० |
| ५५ | सांगली वॉर्ड क्रं. १७ धनगर गल्ली,विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेस वॉल कंपाऊंड करणे. | ११५२००० |
| ५६ | मिरज वॉर्ड क्रं. २० मधील काळी मशीद ते कणवाडकर हौद रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | १०६६००० |

| | | |
|---|---|---|
| ५७ | सांगली वॉर्ड क्रं. १८ मधील शामरावनगर येथील देवेन्द्र सोसायटी येथील मुजावर वाळू डेपो ते माने घरापर्यंत पी.सी.सी. गटर करणे. | ४९९८०० |
| ५८ | वॉर्ड क्रं. ८ मधील पाटील डॉ घर ते गौंडर घरा पर्यंतचा रस्ता बी.बी.एम डांबरीकरण करणे. | ५०००००० |
| ५९ | प्रभाग क्रं १५ मधील १०० फूटी रोड पाकीजा मशीद समोरील जनता पान शॉप ते सुयश अपार्टमेंट पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे. | ९४६२८० |
| ६० | वॉर्ड क्रं. ११मधील नाणीबाई मळा ओपन स्पेसला कंपाऊंड वॉल करणे. | १६५९८०० |
| ६१ | वॉर्ड क्रं. ११ मधील इंदिरा कॉलनी येथील रस्त्यास पी.सी.सी. गटर करणे. | १००००००० |
| ६२ | वॉर्ड क्रं . १५ रमामातानगर डी.पी. रोड कत्तलखाना चौक ते नुराणी मशीद समोरील रस्ता मुनीर अत्तार घरापर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | ११३०००० |
| ६३ | सांगली वॉर्ड नं१७ मधील दिलीप टायर ते चांदणी चौक येथील रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | ८८८९०० |
| ६४ | सांगली वॉर्ड क्रं १७ मनपा त्रिकोणी बाग मध्ये धबधबा तयार करणे. | १९२१००० |
| ६५ | मिरज वॉर्ड क्रं. ४ आदर्श क्लास ते ज्युबिली कन्या शाळा व हरबा तालीम ते शक्ती डेअरी पर्यंतचा रस्ता हॉटमिक्स करणे. | २१३३२०० |
| ६६ | मिरज वॉर्ड क्रं. ४ कारंडे गल्ली येथील बोळ रस्ते सुधारणा करणे. | ७००००० |
| ६७ | वॉर्ड क्रं. १४ मधील कोल्हापूर रोड , राम नगर १ गल्ली गजानन पिठाची गिरणी ते पन्हाळकर गॅरेज पू+प रस्ता उलट बाजूस आर. सी. सी. गटर करणे. | ५५०००० |
| ६८ | वॉर्ड क्र.१९ मधील क्रांतिनगर मनपा ओपनस्पेसला कंपौंड भिंत बांधणे | ९६०००० |
| | **एकूण** | **७०५३२७८०** |

सूचक :- श्री. उत्तम साखळकर. ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryawanshi

अनुमोदक :- श्री. शेडजी मोहिते. महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१**

दिनांक :- १२/०५/२०२१

ठराव क्रमांक :- ४२

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१२/०४/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील जिल्हा उद्योग मित्र समिती आढावा बैठकीच्या अनुषंगाने मनपा क्षेत्रातील एम.आय.डी.सी.मधील रस्ते दुरुस्ती करणेकामी खालील नमुद तीन कामांच्या र.रु.५,७५,५६,४००/- मात्रचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,जिल्हा नियोजन समिती,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व महापालिकेच्या मंजूर वित्तीय आराखड्या व्यतिरिक्त निधी मंजुरीस्तव पाठविणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | मिरज येथील गोविंदराव मराठे औद्योगिक वसाहत मधील पुर्व बाजू कडील अंतर्गत रस्ते हॉटमिक्स डांबरीकरण करणे. | ८९,९९,१००/- |
| २. | कुपवाड येथील मिरज एम.आय.डी.सी.मधील अंतर्गत रस्ते डांबरी पॅचवर्क करणे. | २,८०,००,०००/- |
| ३. | सांगली वॉर्ड क्र.११ येथील वसंतदादा औद्योगिक वसाहत मधील नविन रस्ते हॉटमिक्स डांबरीकरण करणे व पॅचवर्क करणे. | २,०५,५७,३००/- |

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेकडून सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत तयार केलेल्या प्रस्तावामध्ये नमुद असलेली कामे सदर योजनेसाठी असलेल्या महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाचे शासन निर्णय क्र.एन यु आर २०१०/प्र.क्र.३१७/१०/नवि-३३, दि.०८/११/२०१० मधील परिच्छेद क्र.२ अभियानांतर्गत अनुज्ञेय असलेल्या कामांसाठी दिलेल्या निर्देशानुसार लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित केली असून, सदर क्षेत्रातील कामास अर्थसहाय्य मिळणेकरीता सुधारणा कार्यक्रमाच्या दृष्टीने महानगरपालिकेने खालील प्रमाणे कार्यवाही ठेवलेली आहे.

| अ. क्र. | सुधार कार्यक्रम | सद्यस्थिती | पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| १. | द्विनोंद लेखा पद्धतीचा अवलंब करणे | अंमलबजावणी करणेत येत आहे. | --- |
| २. | महानगरपालिका कामकाजाचे संगणकीकरण करणे | अंमलबजावणी करणेत येत आहे. | --- |
| ३. | मालमत्ता कर विषयक सुधारणा | अंमलबजावणी करणेत येत आहे. | --- |
| ४ | उचित उपभोक्ता आकार वसुली संबंधी सुधारणा | अंमलबजावणी करणेत येत आहे. | --- |
| ५ | गरीबांसाठी अर्थसंकल्पात विवक्षीत निधीची तरतुद करणे. | तरतुद करणेत आली आहे. | --- |

सदर नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेंतर्गत महानगरपालिकेस प्रकल्प किंमतीच्या ७०% शासन अनुदान व ३०% महानगरपालिका हिस्सा असे अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे. त्याप्रमाणे प्रकल्प राबविणेकरीता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) महानगरपालिका हिस्सा यासाठी आवश्यकतेप्रमाणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात तरतुद करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री: पांडुरंग कोरे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री: शेडजी मोहिते.

D. J. Suryavanshi

महापौर,

नगरसचिव
महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १२/०५/२०२१

ठराव क्रमांक :- ४३

विषय क्रमांक :- १०

---

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग,सांगली) यांचे दि.०३/०५/२०२११ चेविषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सार्वजनिक बांधकाम विभाग,कार्यकारी अभियंता,मिरज यांनी दि.२०/१०/२०२० रोजी विकास योजनेतील रस्त्याचे भूसंपादन करुन हस्तांतरीत करणेची मागणी केलेनुसार कृष्णा नदीवरील पुलाचे बांधकाम करावयाचे असल्याने, सांगली मिरज कुपवाड शहराच्या विकास योजनेतील ३०.४८ मी.रुंद विकास योजना रस्ता भूसंपादन करुन सार्व.बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करणेस ना-हरकत देणेस व सदर जागेच्या भूसंपादनासाठी नुकसान भरपाईपोटी होणारी रक्कम टी.डी.आर.किंवा एफ.एस.आय. द्वारे आदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, सदर भूसंपादन धारकांनी टी.डी.आर.किंवा एफ.एस.आय. द्वारे नुकसान भरपाई स्विकारणेस नकार दिल्यास, सदर जागेच्या भूसंपादनासाठी मा.केंद्र / राज्य शासनाकडे त्यांच्याकडील भूसंपादनाच्या योजनामधून निधी उपलब्धतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

याचसोबत महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील सदर रस्ता सांगलीवाडी मोहिते मंगल कार्यालय टोलनाका ते सांगली कोल्हापूर रोड वरील अमोल स्टील सेंटर पर्यत विकसनासाठी National Highway Authority of India कडे वर्ग करण्यासही ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- [signature] श्री: मैनुद्दीन बागवान

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi

अनुमोदक :- [signature] श्री: उत्तम साखळकर.

महापौर,

स.स.ह.ल.

[signature]

नगरसचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०२** दिनांक :- १२/०५/२०२१

ठराव क्रमांक :- ४४

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.श्री.युवराज सतिश बावडेकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली प्रभाग क्र.१४ मधील झाशी चौक येथे महापालिकेचे सार्वजनिक मुतारी असून, सदर मुतारी भरबाजार पेठेत रस्त्यावर असून, या मुतारीमुळे रस्त्यावर मलमुत्र येवून दुर्गंधी पसरुन नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे. तसेच मुतारी रस्त्यावर असल्यामुळे रस्त्याची रुंदी कमी होवून वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण झालेला आहे. त्यामुळे सदर मुतारी हलविण्याबाबत नागरिक व व्यापाऱ्यांनी वारंवार तक्रार महापालिकेकडे केलेली आहे. तसेच याबाबत आजुबाजूच्या नागरिकांना व रहिवाश्यांना, व्यापाऱ्यांना त्रास होत असल्याने त्यांनी सदर मुतारी पाडणेबाबत मागणी करीत आहेत. नागरिकांचे मागणीनुसार सदर मुतारी पाडणेकामी मान्यता मिळणेसाठी आलेला प्रस्तावावर प्रशासनाने समक्ष पहाणी करुन, पर्यायी व्यवस्था असल्याची खात्री करुन, सक्षम अखत्यारीची मान्यता घेवून, सदरची मुतारी पाडणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Y. S Bawadekar श्री. युवराज बावडेकर. ठराव सर्वानुमते मंजुर

D. Suryavanshi

अनुमोदक :- श्री. शेडजी मोहिते. महापौर,

महापालिका सचिव

नगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०२** दिनांक :- १२/०५/२०२१

ठराव क्रमांक :- ४५

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य सौ.आरती रविंद्र वळवडे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील गावभाग येथील महापालिका हॉस्पिटल येथे पुर्वी होमिओपॅथीक हॉस्पिटल चालविण्यात येत होते. परंतु सद्या हे हॉस्पिटल बंद असल्याने या ठिकाणी असलेल्या नागरिकांना होमिओपॅथीक औषध उपचारा करीता इतरत्र जावे लागते. गुलाबराव पाटील होमिओपॅथीक मेडीकल कॉलेज व हॉस्पिटल मिरज यांना या ठिकाणी दवाखाना चालू करणेस दिल्यास या परिसरातील नागरिकांची मोठी सोय होणार आहे व सदरचे हॉस्पिटल हे गुलाबराव पाटील होमिओपॅथीक मेडीकल कॉलेज व हॉस्पिटल मिरज यांच्या मार्फत त्यांचेच डॉक्टर व इतर स्टाफ घेवून त्याच बरोबर याकरीता लागणारे होमिओपॅथीक औषध देखील तेच पुरवतील त्यामुळे महानगरपालिकेवर कोणताही आर्थिक बोजा न पडता येथील नागरिकांची मोठी सोय होणार आहे. तरी गुलाबराव पाटील होमिओपॅथीक मेडीकल कॉलेज व हॉस्पिटल मिरज यांना होमिओपॅथीक हॉस्पिटल करीता जागा उपलब्ध करुन देणेकामी आलेला प्रस्तावावर प्रशासनाने सदर ठिकाणीची पहाणी करुन, जागा उपलब्ध होत असल्यास त्याबाबतचा सविस्तर अहवाल प्रशासनाने सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने श्रीमती कांचन युवराज कांबळे यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.१० मधील नविन वसाहत फायर ब्रिगेड ऑफिसच्या पाठीमागे शाळा नं.२२ जवळील शाहू कॉलनी येथे असलेली नविन इमारत सत्यशोधक शिक्षण आणि बहूउद्देशीय कार्यकारी संस्था यांनी मागणी केली असून, सदर संस्थेला महाराष्ट्र शासनाकडून सर्व प्रकारची व्यायाम साहित्य,वाचनालयास लागणारी पुस्तके मिळालेली असून, सदर संस्था या सार्वजनिक उपक्रमामुळे भागातील सर्व नागरिकांना व कर्मचाऱ्यांना कोणतीही फी न आकारता लाभ देणार असल्याने, वॉर्ड क्र.१० मधील नविन वसाहत शाहू कॉलनी येथे असलेली इमारत ना-नफा ना-तोटा या तत्वावर सत्यशोधक शिक्षण आणि बहूउद्देशीय कार्यकारी संस्था या दोघांच्या संयुक्तीकरित्या चालविणेकरीता देणेसाठी सविस्तर अहवाल प्रशासनाने सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- (सही) सौ. आरती वळवडे

ठराव सर्वानुमते मंजुर

(सही)

अनुमोदक :- (सही) श्रीमती कांचन कांबळे

महापौर,

(सही)

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०२** दिनांक :- १२/०५/२०२१

ठराव क्रमांक :- **४६**

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या सन्मा.सदस्यांकडून आवश्यक बार्बीचा पाठपुरावा करुन विविध विकास कामांना मंजुरी प्राप्त करुन घेतली जाते व सदरची कामे मनपा नोंदणीकृत मक्तेदारांकडून केली जातात. परंतु, काही वेळा सदरची कामे वेळेत पुर्ण होत असलेचे दिसून येत नाहीत. हॉटमिक्स रस्ता करीत असताना BM व BC थर पसरताना ठरावीत तापमान (१२० C च्या वर) गरजेचे असते. सदर तापमान हॉटमिक्स प्लॉन्ट महानगरपालिका क्षेत्रापासून २० किलोमीटर अंतरावर असणे आवश्यक आहे व संबंधीत मक्तेदाराने तसा दाखला निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार हॉटमिक्स रस्त्याच्या कामांसाठी सदर बार्बीची पुर्तता करुन घेवूनच संबंधीत मक्तेदारास पात्र ठरविणेस ही सभा मान्यता देत असून, याबाबतच पुढील योग्यती कार्यवाही प्रशासनाने ठेवावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री.शेडजी मोहिते  ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ.पद्मश्री पाटील  महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०२** दिनांक :- १२/०५/२०२१

ठराव क्रमांक :- ४८

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.संगिता अभिजीत हारगे व श्री.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महासभा क्र.०४ विषय क्र.१(ज) ठराव क्र.९८ दि.२०/०१/२०२१ च्या ठरावानुसार बेडग रस्त्यावरील मनपा कॉमन इन्सिनेटर प्रकल्प व त्यास आवश्यक जागा व सद्यस्थितीतील इमारतीचा ताबा देवून सदर प्रकल्प IMA पुलाची शिरोली यांना प्रति महा र.रु.४० हजार रॉयल्टी भरणेच्या अटीवर पंधरा वर्षे मुदतीने देण्याचा निर्णय झालेला होता. तथापि, IMA मिरज यांनी सदर प्रकल्प उभा करण्यासाठी व वेळोवेळी होणाऱ्या देखभाल दुरुस्तीवर तसेच MPCB कडून घेणेत आलेले आक्षेपांचे निराकरण करणेसाठी आवश्यक बाबींची पुर्तता करणेत आलेली आहे व याकामी आज अखेर अंदाजीत रु.७० ते ८० लक्ष इतका खर्च केलेला आहे. सद्या सदरचा प्रकल्प सुरु होणाच्या मार्गावर असून, सदरचा प्रकल्प इतर कोणास चालविणसे दिल्यास तर IMA मिरज हे न्यायालयामध्ये जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सुरु होणारा प्रकल्प रखडून विनाकारण न्यायालयीन बाब निर्माण होणार आहे ही बाब विचारात घेता, महासभा क्र.०४ विषय क्र.१(ज) ठराव क्र.९८ दि.२०/०१/२०२१ अन्वये पारित करणेत आलेला ठराव ही सभा रद्द करीत असून, सदरचा प्रकल्प प्रतिमहा र.रु.४० हजार रॉयल्टी भरुन घेवून, महापालिका शर्ती-अटीनुसार १५ वर्षे मुदतीने IMA मिरज यांना पुर्वीप्रमाणेच चालविण्यास देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.शेडजी मोहिते ठराव ~~बहुमताने~~ मंजुर

D. Suryavanshi
अनुमोदक :- सौ.संगिता हारगे. महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका